N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District** (जिल्हा): सोलापुर ग्रामीण **P.S.**(ठाणे): सांगोला **Year** (वर्ष): 2022

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0778 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 29/06/2022 23:24 बजे

2. S.No. (अ.क्र.) Acts (अधिनियम)

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): बुधवार **Date From** (दिनांक पासून): 29/06/2022
**Time Period** (कालावधी): पहर 5 **Date To** ( दिनांक पर्यंत): 29/06/2022
**Time From** (वेळेपासून): 12:21 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 14:02 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
**Date** (दिनांक ): 29/06/2022 **Time** (वेळ): 23:24 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ
**Entry No.** (नोंद क्र.): 036 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 29/06/2022 23:24 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): उत्तर, 36 किमी
**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): तलाठी कार्यालय संगेवाडी तास

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री. सुयेश मधुकर ताटे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1993 **(d) Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्त्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | रा शिरभावी, ता सांगोला, जि ,सांगोला,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | रा शिरभावी, ता सांगोला, जि ,सांगोला,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नारायण विठ्ठल खरात | | | 1. एकतपूर रोड, मस्के कलणी, सांगो, सांगोला,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | मयुर गुलचंद भोरे | | | 1. रा संगेवाडी ता सांगोला,सांगोला, सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दिनांक 29.06.2022मी श्री. सुयेश मधुकर ताटे, वय-29 वर्षे, व्यवसाय-मेडिकल दुकान, रा. शिरभावी, ता. सांगोला, जि. सोलापूरसमक्ष फिर्यादी जबाब देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहणेस असुन मेडिकल दुकान व्यवसायावर माझ्या कुटुंबाचा उदनिर्वाह करतो. मौजे शिरभावी येथे गट क्र.65 चा 10,11,12,14 मध्ये असलेले 156 आर वरती आमची वडीलोपर्जित शेत जमीन आहे. माझे वडील एप्रिल 2020 रोजी मयत झालेने त्यांच्या नांवावर असलेल्या जमिनीवर वारस म्हणून माझे, माझा भाऊ व माझ्या आईचे नाव लागलेले होते. सदरचे शेती जमीनीवरील माझे व माझे भावाचे नाव कमी करुन फक्त आमच्या आईचे नांव वारस म्हणून नोंद करावयाची होती. त्याकरिता आम्ही मा. तहसिलदार, तहसिल कार्यालय सांगोला येथे जावून दि.14.06.2022 रोजी हक्कसोडपत्र तयार केले होते. त्याप्रमाणे आम्ही सदरचे हक्कसोडपत्र व त्यासोबत अर्ज तयार करुन मौजे शिरभावीचे गावकामगार तलाठी खरात साहेब यांच्याकडे दि.23.06.2022 रोजी दिला. त्यावेळेस तलाठी खरात यांनी हक्कसोडपत्राप्रमाणे सदर गट क्र.65 वरील नांवे कमी करण्यासाठी मला 2000/- रुपये लागतील व सदरची रक्कम त्यांचे कार्यालयातील खाजगी मदतनीस म्हणून काम करणारा इसम नामे मयुर याच्या फोन पे च्या अकाऊंटवर लाचेची रक्कम टाकण्यास सांगितले. मी तलाठी खरात यांना सध्या माझ्याकडे ऐवढे पैसे नाहीत, माझे काम पुर्ण करुन ठेवा, काम झाले की मी पैसे आणुन देतो असे सांगुन निघुन आलो. त्यानंतर मी इतर ठिकाणी चौकशी केली असता, हक्कसोडपत्राप्रमाणे वारस नोंद करणेकामी कोणत्याही प्रकारची शासकीय फि दयावी लागत नसल्याची माहिती समजली. त्यामुळे तलाठी खरात हे माझ्याकडे मागत असलेले 2000/- हे लाच रक्कम असल्याचे मला खात्री झाली. मला तलाठी खरात यांना कोणतीही लाच देण्याची इच्छा नसल्याने माझ्याकडे लाचेची मागणी करणारे तलाठी खरात यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई म्हणून मी दिनांक 27.06.2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंध विभाग, सोलापूर येथे मोबाईलवर संपर्क साधुन पोलीस निरीक्षक श्री. चंद्रकांत कोळी यांना लाच मागणीची तक्रार सांगितली व मी दि.29.06.2022 रोजी तलाठी खरात यांना भेटण्यास जाणार असल्याचे सांगितले.त्यावरून त्यांनी मला दिनांक 29.06.2022 रोजी सकाळी 11.00 वा. मेथवडे फटा येथील मांजरी हायस्कुल येथे येवून थांबावयास सांगितले. त्याप्रमाणे मी दिनांक 29.06.2022 रोजी सकाळी 11.00 वा. मेथवडे फटा येथील मांजरी हायस्कुल येवून थांबलो. त्यावेळेस पोलीस निरीक्षक चंद्रकांत कोळी हे त्यांचे स्टाफसह तेथे शासकीय वाहनाने आले. त्यानंतर पोनि कोळी यांनी मला वाहनामध्ये बोलावून घेवून त्यांची व तेथे उपलब्ध असलेल्या पंचायत समीती, मंगळवेढा, या कार्यालयातील शासकीय पंच श्री. पोपट कांबळे व श्री. नंदकुमार स्वामी यांची ओळख करून दिली. त्यानंतर पोनि कोळी यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचानी मला माझे नाव गाव विचारले असता, मी माझे नाव गाव त्यांना सांगितले. त्यानंतर पोनि कोळी यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली असता, मी तलाठी खरात यांचे

विरूध्दची वरीलप्रमाणे तक्रार सांगितली. त्यानंतर पोनि कोळी यांचे सांगणेवरुन पंचासमक्ष मी माझी तक्रार लिहुन दिली. सदरची लेखी तक्रार पोनि कोळी व दोन्ही पंचानी वाचून त्यावर सह्या केल्या. त्यानंतर पोनि कोळी यांनी मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरवले. त्यासाठी आम्हास व्हईस रेकर्डर दाखवून त्याविषयी माहिती दिली व त्यामध्ये नवीन 8 जी.बी. चे मेमरी कार्ड टाकण्यात आले. त्यानंतर पोनि कोळी यांनी मी व माझ्या सोबत पंच नं 1 कांबळे यांना सुचना दिल्या की तलाठी खरात यांच्याकडे मौजे शिरभावी, मेटकरवाडी या दोन गावांचा अतिरिक्त कार्यभार असून ते सजा संगेवाडी येथील तलाठी कार्यालयात बसुन कामकाज करतात. त्यासाठी आम्ही संगेवाडी गावातील तलाठी कार्यालयात जावून तेथे तलाठी खरात यांची भेट घेवून त्यांच्याशी माझे कामाबाबत चर्चा करावी. त्यावेळी त्यांनी लाचेची मागणी केल्यास थोड्यावेळात आणून देत असल्याबाबत सांगावे, अश्या सविस्तर सुचना मला व पंच नं.1 कांबळे यांना दिल्या. त्यानंतर संगेवाडी गावाकडे माझ्या गळ्यात व्हईस रेकर्डर शर्टाचे आतील बाजूस चालु करुन आडकावून मला व पंच नं.1 कांबळे यांना माझ्या चारचाकी वाहन क्र.एम.एच.45 एन 0543 मधुन पाठवले. त्यावरुन मी, पंच नं 1 कांबळे यांच्यासह तलाठी खरात यांची संगेवाडी गावातील तलाठी कार्यालयात भेट घेवून माझ्या कामाबाबत चर्चा करत असताना, मी तलाठी खरात यांना म्हणालो की, मग मी जाऊ का मग तेवढ घ्या करुन आठवडा भरात.. आठ दहा दिवसात.. त्यावर तलाठी खरात यांनी तेच्यासाठी तर बोलवले आता तरी करा.. उगी तोंडाची वाफ घालवु नका असे बोलुन तलाठी खरात यांनी माझ्याकडे पाहून त्यांच्या उजव्या हाताची दोन बोटे वर करुन 2000/- रुपये देण्याचा इशारा केला. त्यानंतर मी आता नाय गेल तर.. आणुन देतो पंपावरुन असे बोललो, त्यावर तलाठी खरात असे म्हणाले. त्यावर मी तलाठी खरात यांना हाय ना थोडा वेळ तुम्ही असे म्हणालो असता, त्यावर तलाठी खरात ये ये लवकर ये असे म्हणाले. त्यावर मी पुन्हा तलाठी खरात यांना स्कनर दया ना.. भाऊसाहेब जरी नाही गेल तरी मी येतो पंपावरुन जावुन.. त्यावर खाजगी इसम मयुर म्हणाला की, भाऊसाहेब नाही जाणार त्यावर मी येतो जावुन असे बोलुन थोडया वेळात लगेच पैसे देण्याचे ठरले. त्यावरून मी व पंच नं.1 कांबळे असे नियोजित ठिकाणी परत आलो. तेथे पोनि कोळी यांनी माझ्या गळ्यातील व्हईस रेकर्डर काढून पंच नं.1 कांबळे व मला हकीकत विचारून घेतली. त्यामध्ये आम्ही उपरोक्त प्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर पोनि कोळी, यांनी व पंचांनी व्हईस रेकडरमध्ये माझ्यात व तलाठी खरात यांच्यात झालेले संभाषण ऐकले. त्यानंतर पोनि कोळी यांनी सापळा पथकातील कर्मचारी यांना शासकीय वाहनाकडे बोलावुन त्यांची ओळख करुन दिली त्यामध्ये पोहवा सोनवणे, पोना पकाले, पोक जानराव, पोक सण्णके व शासकीय चालक सुरवसे असे होते. त्यांना आज रोजी तलाठी खरात यांची झालेल्या पडताळणी बाबत माहीती देवुन तलाठी खरात यांच्यावर मौजे संगेवाडी येथील तलाठी कार्यालय येथे सापळा कारवाई आयोजीत केली असल्याचे सांगितले.त्यानंतर लगेच पोनि कोळी यांच्या सुचनेवरून मी तलाठी खरात यांना देण्यासाठी माझ्याकडे असलेले 2000/- रूपये हजर केले. त्यात 500/- रूपये दराच्या 04 नोटा होत्या. मी हजर केलेल्या नोटांचे क्रमांक पोनि कोळी यांनी त्यांच्या पथकातील अंमलदाराकरवी कोऱ्या कागदावर लिहुन घेवून त्याचेवर पोनि कोळी व दोन्ही पंचानी सदरच्या नोटांचे नंबर लिहलेल्या कागदावर सह्या केल्या. त्यानंतर सदर नोटांना ॲंथ्रासीन पावडर लावण्याचा, त्याचे प्रात्यक्षीक करण्याचा व सापळा कारवाईमध्ये करावयाच्या कामाच्या सुचनांचा सविस्तर सापळापूर्व पंचनाम्याची कार्यवाही शासकीय वाहन क्रमांक एम.एच.12 युसी 4108 मध्ये करण्यात आली. त्यानंतर यातील तलाठी खरात यांच्यावर संगेवाडी येथील तलाठी कार्यालय येथे लाचेचा सापळा आयोजीत केला. त्याअनुषंगाने पुन्हा पोनि कोळी यांनी माझ्या गळयात शर्टाच्या आत व्हईस रेकर्डर चालु करुन आडकविला. त्यानंतर मी व पंच नं 1 कांबळे असे दोघेजन माझ्या चारचाकी वाहनामधुन व उर्वरीत सापळा पथक शासकीय वाहन क्रमांक एम.एच.12 युसी 4108 मधून संगेवाडी गावातील तलाठी कार्यालया जवळ आलो. तेथे मी, पंच नं 1 कांबळे यांच्यासह तलाठी खरात यांची भेट घेण्यासाठी गेलो असता तेथे तलाठी खरात हे त्यांच्या मोटार सायकलकडे जात असल्याचे दिसल्याने मी त्यांना म्हणालो चाल्ला बर काम तेवढ भाऊसाहेब मार्गी लावा, त्यावर तलाठी खरात ओके.. हं.. करतो.. असे म्हणून उजव्या हाताचा अंगठा तर्जनीवर घासून पैसे देण्याचा इशारा करुन ते पैसे कार्यालयात बसलेला खाजगी इसम मयुर यांच्याकडे देण्याचा इशारा केला. त्यावर मी त्यांच्याकड दिवु मयुर कडे असे बोललो असता, तलाठी खरात यांनी मान हालवुन होकार दिला. त्यामुळे मी पुन्हा तलाठी कार्यालयात जावून खाजगी इसम मयुर यांना म्हणालो की, भाऊसाहेब बोलल्यानुसार दोन हजार रुपये घ्या.. काम तेवढ मार्गी लावायला पाहिजे असे बोललो असता, खाजगी इसम मयुर त्यावर होय.. असे बोलल्या नंतर मी माझ्या शर्टाच्या डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवलेल्या 2000/- रुपये रकमेच्या लाचेच्या नोटा उजव्या हाताने काढून खाजगी इसम मयुर यांचेसमोर धरली असता, त्यांनी ती लाचेची रक्कम उजव्या हाताने स्विकारुन तो स्वत: मयुर काम करत बसलेल्या टेबलच्या उजव्या बाजूस असलेल्या ड्राव्हरमध्ये ठेवली. त्यानंतर मी तलाठी कार्यालयाच्या बाहेर येवून केलेल्या नियोजीत इशाऱ्यावरुन सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी सदर ठिकाणी येवून खाजगी इसम मयुर यास रंगेहात पकडले. त्याच दरम्यान तलाठी खरात हे त्यांच्या मोटार सायकलवरुन निघुन जात असताना त्यांना देखील सापळा पथकातील कर्मचारी यांनी ताब्यात घेतले आहे. त्यानंतर पोनि कोळी यांनी तलाठी कार्यालय संगेवाडी येथे दोन्ही पंचासमक्ष खाजगी इसम खरात यांचे दोन्ही हातांची व ड्राव्हरची पुरेसा अंधार करून अ.वा. दिव्याच्या निळे प्रकाशात तपासणी केली असता त्यांचे उजव्या हातांच्या बोटाच्या पेऱ्यावर व ड्राव्हरच्या आतील बाजुस अ.पा.ची निळसर चकाकी दिसून आली. तसेच त्यांचेकडे मिळून आलेल्या नोटांची कागदावर नमूद केलेल्या नोटांच्या नंबरांशी पडताळणी करता ते तंतोतंत मिळून आले. तसेच सदर नोटांची देखील ॲवा.दिव्याचे निळ्या प्रकाशात तपासणी करता त्या नोटांवर देखील अ.पा.ची निळसर चकाकी दिसून आली. खाजगी इसम मयुर यांच्या ताब्यातुन घेतलेल्या सदरच्या नोटा पुराव्याकामी जप्त करण्यात आलेल्या आहेत. पोनि कोळी यांनी तलाठी खरात यांना त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नांव नारायण विठ्ठल खरात, वय 36 वर्षे, पद-तलाठी, सजा संगेवाडी, ता. सांगोला, जि. सोलापूर, रा. एकतपूर रोड, मस्के कलणी, सांगोला, जि. सोलापूर व तसेच खाजगी इसमास त्याचे नांव, गाव पत्ता विचारले असता त्यांने त्यांचे नांव मयुर गुलचंद भोरे, वय 20 वर्षे, व्यवसाय- तलाठी यांचे खाजगी मदतनीस, रा. संगेवाडी, ता. सांगोला, जि.सोलापुर असे सांगितले. सदरबाबत सविस्तर पडताळणी, सापळापूर्व व यशस्वी सापळा पंचनामा शासकीय विश्राम गृह, पंढरपूर येथे दि. 29.06.2022 रोजी पूर्ण करण्यात आलेला आहे. तरी दि. 29.06.2022 रोजी 12.21 वा ते दिनांक 29.06.2022 रोजीचे 14.02 वा. दरम्यान नारायण विठ्ठल खरात यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरुपयोग करून त्यांना कायद्याने मिळावयाचे त्या खेरीज लाच म्हणून माझे मौजे शिरभावी येथील वडीलोपार्जित शेतजमीन गट क्र.65 वरील हक्कसोड प्रमाणपत्रानुसार नोंद घेणेसाठी 2,000/- रूपये लाचेची मागणी करून, लाच रक्कम 2000/- रुपये लाचेची रक्कम तलाठी खरात यांचे सांगणेवरून खाजगी इसम मयुर यांनी स्वत: स्विकारुन लोकसेवक खरात व खाजगी इसम मयुर यांनी सांपत्तीक फायदा मिळवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणुन माझी नारायण विठ्ठल खरात पद-तलाठी व खाजगी इसम मयुर गुलचंद भोरे यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम अन्वये फिर्याद आहे. माझा वरील फिर्यादी जबाब हा आपले कडील असलेल्या लपटपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रींट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.हा जबाब दिला स.ता.म समक्ष (चंदकांत कोळी) पोलीस निरीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Suhas Laxman Jagtap(I (Inspector)) / PBMH73577 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

ठाणे अंमलदार
अंकोला पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** Suhas Laxman Jagtap
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PBMH73577